बाष्पके संचालनालयाच्या आस्थापनेवरील अधिकाऱ्यांची वयाच्या ५०/५५ वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यावर सेवेत राहण्यासाठी पात्रता अजमावण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांकः बाष्पके- १०१८/प्र.क्र.१५५/काम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १५ नोव्हेंबर, २०१८

वाचा:-

१. सा. प्र. वि., परिपत्रक क्र. विपुस-१०९७/प्र.क्र.१३६/९७/१५, दि.१९/०६/१९९८.
२. सा. प्र. वि., शुध्दीपत्रक क्र. विपुस-१०९७/प्र.क्र.१३६/९७/१५, दि.२५/०६/१९९८.
३. सा. प्र. वि., परिपत्रक क्र. विपुस-१०९९/प्र.क्र.५८/९९/१५, दि.१६/०९/१९९९.
४. उ.ऊ. व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. औसुवआ १११४/प्र.क्र.७१/काम-१ दि.३१.०३.२०१५.

शासन निर्णय :

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ च्या नियम १० (४) व नियम ६५ अनुसार बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई च्या आस्थापनेवरील पुनर्विलोकनास पात्र ठरलेल्या गट अ संवर्गातील अधिकाऱ्यांचे वयाच्या ५०/५५ वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यावर सेवेत राहण्याची पात्रता अजमावण्याच्या दृष्टीने व त्यांचे पुनर्विलोकन करुन शिफारस करण्यासाठी प्रधान सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीची दि.०२.११.२०१८ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत बाष्पके संचालनालयातील खालील गट अ अधिकाऱ्यांना वयाच्या ५०/५५ वर्षापलिकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यावर सेवेत राहण्यासाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

१. श्री.ध.प्र.अंतापूरकर, उप संचालक,
२. श्री.सं. लो. कुंभलवार,सह संचालक,
३. श्री.उ. शं. मदने, उप संचालक

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१८१११५१२३१३४१५१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Meghashyam Nawar

Digitally signed by Meghashyam Nawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7d2d0d7e2120f3814eff2bd1a5d3c902860ebecbe995c3b2260a01b762f45c3a, serialNumber=a5505efe2f8776471817f30ce3446f37d84d8aeddd35d8e3a76a12d1b08434dd, cn=Meghashyam Nawar
Date: 2018.11.15 12:40:03 +05'30'

(मेघःश्याम नवार)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र-१/२,मुंबई/नागपूर.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

३) प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, कामगार भवन, ७ वा मजला, प्लॉट नं.सी-२०, ब्लॉक नं.ई, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रे (पू.) मुंबई-४०० ०५१.

४) सर्व संबंधित अधिकारी (द्वारा : प्रभारी संचालक, बाष्पके संचालनालय, कामगार भवन, ७ वा मजला, प्लॉट नं.सी-२०, ब्लॉक नं.ई, बांद्रा-कुर्ला संकुल, बांद्रे (पू.) मुंबई-४०० ०५१.)

५) सामान्य प्रशासन विभाग (कार्यासन १४),मंत्रालय,मुंबई.

६) मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

७) मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

८) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

९) निवडनस्ती (कामगार-१) उ.ऊ. व.का. वि., मंत्रालय, मुंबई.